ANNEXURE- III

# Maharashtra University of Health Sciences, Nashik

## Trust Deed/ Bylaws/ Registration Certificate (Trust/ Hospital (Bombay Nursing Act)

**Faculty: Nursing**

**Name of College/ Institute:- Shree Anant Smriti Charitable Trust, Kasal's Institute of Nursing, Kasal**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust/ Society | | **Shree Anant Smriti Charitable Trust, Kasal** |
| Registration Certificate | | Trust/ Society:- Trust E-299/Sindhudurg<br>Date:- 09-06-2006<br><br>Hospital (Bombay Nursing Act):- NA |
| Name of the College/ Institute (As per First Affiliation letter) | : | **Shree Anant Smriti Charitable Trust, Kasal's Institute of Nursing, Kasal** |
| Address | : | **AP-Gaorai, Tal-Kudal, Dist- Sindhudurg, Pin-416534** |
| Email ID | : | **ananteduion@gmail.com** |
| Telephone / Mobile No. (s) | : | **7499921089** |
| Website | : | **www.ionkasal.org** |
| College Code | : | **151118** |

**Date: 25/01/2024**

Principal
SASCT's, Institute of Nursing, Kasal
At Post- Gaorai, Tal- Kudal,
Dist.- Sindhudurg PIN- 416534

**Principal Stamp & Signature**

[विशेष-चं.अ./मुं.सा.वि./२म.

001

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुबई अधिनियम २९) या अन्वये सिंधुदुर्ग विभाग सिंधुदुर्ग येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव : श्री. अनंत स्मृती चॅरीटेबल ट्रस्ट, कसाल, ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ई-२९९/सिंधुदुर्ग

श्री. चीराग शंभु बांदेकर यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ६/१/२००६ १९९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही सहाय्यक धर्मादाय आयुक्त

पदनाम सिंधुदुर्ग विभाग सिंधुदुर्ग

Principal
SASCTK's, Institute of Nursing, Kasal
At Post- Gaorai, Tal- Kudal,
Dist.- Sindhudurg PIN- 416534

100Rs.

INDIA NON JUDICIAL

१०० रु. Rs 100

सत्यमेव जयते
भारत

एक सौ रुपये ONE HUNDRED RUPEES

महाराष्ट्र MAHARASHTRA G 642656

SUB TREASURY OFFICE KANKAWALI

Sub Treasury Officer
Kankawali
7 MAR 2006

Read & Recorded

"श्री. अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल",
ता. कुडाळ, जि. सिधुदुर्ग या न्यासाचे विश्वस्त व्यवस्थापत्र

सदरचे विश्वस्त व्यवस्थापत्र आज दिनांक १४/०३/ २००६ रोजी ओरोस येथे करण्यात आलेला आहे. सदरहू विश्वस्त व्यवस्थापत्र (ट्रस्ट डिड) ---

१) श्री. विराग शंभू बांदेकर,
वय वर्षे २५, व्यवसाय - व्यापार,
घ. नं १५५ ब, एस.टी.स्टॅंड समोर
मु.पो. कसाल, ता. कुडाळ,
जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३

यांच्यात की ज्यांचा उल्लेख यापुढे या विश्वस्त व्यवस्था पत्रात "सेटलर" यांचेमध्ये तो एक भाग .......

आणि

१) श्री. चिराग शंभू बांदेकर — मुख्य विश्वस्त
वय वर्षे २५, व्यवसाय - व्यापार,
घ. नं १५५ ब, एस.टी.स्टॅंड समोर
मु.पो. कसाल, ता. कुडाळ,
जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३.

२) श्री. जयवंत अनंत बांदेकर — विश्वस्त
वय वर्षे ५१, व्यवसाय - व्यापार,
घर नं. १०२१, केळूसकरवाडी,
मु. पो. कसाल, ता. कुडाळ,
जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३.

३) श्री. सचिन सुर्यकांत परब — विश्वस्त
वय वर्षे २७, व्यवसाय - व्यापार,
घ. नं. ४८४, मु. पो. ओसरगाव,
कानसळीवाडी, ता. कणकवली,
जि. सिंधुदुर्ग. पिन - ४१६६०२.

की ज्यांचा उल्लेख यापुढे सामुदायिकरित्या **''विश्वस्त मंडळ''** म्हणून करण्यात आलेला आहे...... तो एक भाग

यांच्यामध्ये करण्यात आलेला आहे.

Bandekar    जयवंत अनंत बांदेकर    [signature]

# प्रास्ताविक

श्री. अनंत शंकर बांदेकर हे वारकरी होते. आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी समाजाला सर्व प्रकारे मदत केली. आपली आर्थिक परिस्थिती नसतानाही त्यांचा हात मदतीस सदैव पुढेच राहीला. आपल्या पूर्ण हयातीत ते प्रतिष्ठेत व आदरणिय राहीले. ते इतके लोकप्रिय होते की, सर्व लोक प्रेमाने त्यांना अण्णा म्हणत. त्यांनी आपल्या हयातीत अनेक समाज उपयोगी कार्ये केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून केली. त्यांनी नेहमी गरीब व गरजूंना मदत केली. समाजाचा आर्थिक, बौध्दिक विकास व्हावा अशी त्यांची इच्छा होती. तसेच आपल्या हयातीत अनेक समाज उपयोगी योजना व प्रकल्प राबविण्याची त्यांची इच्छा होती. परंतू आर्थिक परिस्थिती व काही अडचणीमुळे त्यांना ही कार्ये पूर्ण करता आली नाहीत.

त्यांच्या या अपूर्ण राहीलेल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी, तसेच त्यांचे नाव कायम या समाजाच्या स्मृतीत राहण्यासाठी अनेक समाज उपयोगी उपक्रम, कार्य करण्यासाठी, गरजवंताना, गरीबांना मदत व्हावी, त्यांचे राहीमानांचा दर्जा उंचवावा, त्यांना वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात म्हणून तसेच शैक्षणिक उपक्रमामुळे समाजाचा, विद्यार्थ्यांचा फायदा व्हावा म्हणून श्री. अनंत शंकर बांदेकर यांचा नातू (श्री. अनंत शंकर बांदेकर यांचे चिरंजीव श्री. शंभू अनंत बांदेकर यांचा मुलगा) म्हणून मी श्री. चिराग शंभू बांदेकर अनेक लोकहित कामे करण्यासाठी विविध सार्वजनिक, धर्मादाय, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक उद्देशांचे पुर्ततेसाठी ''श्री. अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल'' ची स्थापना करत आहे.

ज्याअर्थी श्री. चिराग शंभू बांदेकर, राहणार कसाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांनी ''श्री. अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल'' या नावाने न्यास निर्माण करण्याची इच्छा व्यक्त केली आहे व त्या न्यासाच्या निर्मितीसाठी न्यास निधी म्हणून स्वकष्टार्जित उत्पनापैकी रक्कम रुपये १००१/- (रूपये एक हजार एक मात्र) ही रक्कम परत न घेण्याच्या अटीवर ते कायमस्वरूपी ठेवू इच्छीतात व त्यानुसार त्यांनी ही रक्कम विश्वस्त व्यवस्थापत्र अंमलात येणेपूर्वीच वरील विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द केलेली आहे आणि त्या रकमेवरील स्वत:ची मालकी व ताबा संपुष्टात आणलेला आहे. त्याअर्थी ते सदर न्यासाचे **''सेटलर''** बनतात. तसेच ते न्यासाचे **''मुख्य विश्वस्त''** म्हणून राहणार आहेत.

विश्वस्त मंडळाने हि रक्कम कायमस्वरूपी ठेव ठेवून त्या रकमेच्या व्याजातून सर्व समाजाच्या धार्मिक शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक व संस्कृतिक आणि धर्मादाय स्वरूपाच्या उद्देशांच्या हेतूसाठी वापर करण्याची इच्छा सेटलर यांनी व्यक्त केलेली आहे आणि ....

वर नमूद केलेल्या **'' विश्वस्त मंडळाने ''** सेटलर यांच्या इच्छापूर्तीसाठी सदरची न्यास निधीची रक्कम रूपये १००१/- (रूपये एक हजार एक फक्त ) चा स्विकार केलेला आहे आणि सेटलर यांची वरील इच्छांची पूर्ती करण्याचे ठरविलेले आहे. त्याअर्थी ''श्री. अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल'' हा न्यास दिनांक १४/०३/२००६ रोजी अस्तित्वात आला असे घोषित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी सेटलर व विश्वस्त मंडळ हे पुढील काळात न्यासाची व्याप्ती वेळोवेळी देणगी, वर्गणी, अनुदान, बक्षिसपत्रे अगर अन्य बिदगींच्या रूपाने वाढवू इच्छितात त्याअर्थी खाली नमूद केल्याप्रमाणे सदरहू न्यास स्थापन करण्यासाठी सदरच्या विश्वस्त व्यवस्थापत्राचे लिखाण करण्यात येत आहे.

१) न्यासाचे नाव :- ''श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल''

२) न्यासाच्या कार्यालयाचा पत्ता :- ''श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल''
द्वारा श्री. जयवंत अनंत बांदेकर
घर नं. १०२१, केळूसकरवाडी,
मु. पो. कसाल, ता. कुडाळ,
जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३.

३) न्यासाचे उद्देश :-

१) लोकांमध्ये आरोग्य विषयक जागृती निर्माण व्हावी यासाठी जनजागृतीचे विविध उपक्रम राबविणे. रक्तदान तसेच आरोग्य विषयक शिबिरे भरविणे.

२) फिरते रूग्णालय , रूग्णवाहिका सुरू करून गरजुंना मदत करणे.

३) सर्व सोयीनीयुक्त व्यायामशाळा, ग्रंथालय, वाचनालय सुरू करणे व चालवणे.

४) विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्टया आवश्यक त्या सर्व सुविधा पुरवणे.

५) वैद्यकिय महाविद्यालये उदा. अॅलोपॅथी, होमिओपॅथी, आयुर्वेदिक, डेंटल कॉलेज हे कोर्सेस सुरू करणे.

६) डी - फार्म, बी - फार्म, एम - फार्म, डी. एड., बी. एड., एम. एड., बी. पी. एड., कायदा शिक्षण, कृषी विद्यालये, वैद्यकिय, पशुवैद्यकिय, इंजिनिअरींग, टेक्निकल, पॉलिटेक्नीक, आय. टी. आय, फॅशन डिझायनींग इ. संबंधीत कोर्सेस, कॉलेजेस, संस्था स्थापन करणे व चालवणे.

७) पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सेस उदा. एम. डी, एम. एस., डिप्लोमा कोर्सेस, डी. एन. बी. कोर्सेस सुरू करणे व चालवणे.

८) भारतातील व भारताबाहेरील विद्यापीठांच्या / संस्थांच्या सहकार्याने निरनिराळे शैक्षणिक कोर्सेस सुरू करणे व चालवणे.

९) व्यावसायिकदृष्टया आवश्यक त्या संस्था, मराठी व इंग्रजी माध्यमातून बालवाडया, अंगणवाडया, आश्रमशाळा, प्राथमिक व माध्यमिक शाळा, उच्च महाविद्यालये, कला, वाणिज्य व शास्त्र शाखांची महाविद्यालये सुरू करणे व त्यांचे व्यवस्थापन पाहणे.

१०) अनाथ मुलांसाठी अनाथालय, वृद्धांसाठी वृद्धाश्रम, विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह स्थापन करून त्याची सर्व सोयींनी युक्त अशी बांधणी करून शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी वापर करणे.

११) पर्यटन विकासास चालना देणारे उपक्रम राबविणे, त्यासाठी आवश्यकता असल्यास विश्रामगृहे, हॉटेल्स, रिसॉर्टस्, मोटेल्स सुरू करणे व चालवणे तसेच हॉटेल मॅनेजमेंट, कॅटरींग, टूरिझम डेव्हलपमेंट इ. कोर्सेस सुरू करणे.

१२) जिराईत, बागाईत, पडीक जमिन विकसित करणे आणि त्यांची खरेदी व विक्री करणे, पाणलोट क्षेत्र विकास करणे. खते, बी - बियाणे, फवारणी औषधे इ. विषयी संशोधन करणे, त्यासाठी आवश्यक त्या प्रयोगशाळा उभारणे व त्याचा जनतेस पुरवठा करणे.

१३) विविध सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम साजरे करणे.

१४) कॉम्प्युटरचे नवनवीन कोर्सेस, अभ्यासक्रम सुरू करणे व प्रशिक्षण देणे.

१५) साहित्य, कला, संगीत, नृत्य, नाटय, वक्तृत्व आदी कलांचे प्रशिक्षण देणे, स्पर्धा आयोजित करणे या बरोबरच साहित्य संमेलने, कवी संमेलने, नाटय संमेलने तसेच इतर संमेलने आयोजित करणे, विविध छंद वर्गांचे आयोजन करणे.

१६) सांस्कृतिक भवनांची उभारणी करून ती अल्प मोबदल्यात जनतेस उपलब्ध करून देणे.

१७) समान उद्देश असणाऱ्या इतर धर्मादाय संस्थांना सर्व प्रकारे मदत करणे.

१८) न्यासाच्या फायदयासाठी कोणताही कायदेशीर व्यवसाय व व्यापार करणे.

४) ''श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल'', ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग या न्यासाच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू न्यासाची व्यवस्था वा कारभार सोपविलेला आहे त्या पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे, वय, पत्ते, हुद्दे व व्यवसाय खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | संपूर्ण नाव | वय | पत्ता | हुद्दा | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. चिराग शंभू बांदेकर | २५ | घ. नं १५५ ब,एस.टी.स्टॅंड समोर मु.पो. कसाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३ | अध्यक्ष | व्यापार |
| २ | श्री. जयवंत अनंत बांदेकर | ५१ | घर नं. १०२१, केळूसकरवाडी, मु. पो. कसाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३ | सचिव | व्यापार |
| ३ | श्री. सचिन सुर्यकांत परब | २७ | घ. नं. ४८४, मु. पो. ओसरगाव, कानसळीवाडी, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. पिन - ४१६६०२ | खजिनदार | व्यापार |

५) आम्ही खाली सहया करणारे ''श्री. अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल'', ता. कुडाळ, जि. सिधुदुर्ग या न्यासाच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचे सभासद जाहिर करतो की, मुंबई सार्वजजिक विश्वस्त व्यवस्था, १९५० चे कलम १८ अन्वये अभिप्रेत केलेला न्यास अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन ''श्री. अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल'', ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग हा न्यास दिनांक : १४/०३/२००६ रोजी स्थापन केला असून तो न्यास मुंबई सार्वजजिक विश्वस्त व्यवस्था, १९५० चे कलम १८ अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही विज्ञापनावर सहया केल्या आहेत.

| अ.क्र. | संपूर्ण नाव | पत्ता | सही |
|---|---|---|---|
| १ | श्री. चिराग शंभू बांदेकर | घ. नं १५५ ब,एस.टी.स्टॅंड समोर मु.पो. कसाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३ | [signature] |
| २ | श्री. जयवंत अनंत बांदेकर | घर नं. १०२१, केळूसकरवाडी, मु. पो. कसाल, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३ | [signature] |
| ३ | श्री. सचिन सुर्यकांत परब | घ. नं. ४८४, मु. पो. ओसरगाव, कानसळीवाडी, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. पिन - ४१६६०२ | [signature] |

स्थळ :- ओरोस

दिनांक :- १४/०३/ २००६.

वरील व्यक्तींना मी ओळखत असून त्यांनी माझ्या समक्ष या विज्ञापनावर सहया केल्या आहेत.

दिनांक :- १४ /०३/ २००६.

विशेष कार्यकारी दंडाधिकारी / वकील /
सनदी लेखापाल / नोटरी यांचे
संपूर्ण नाव :- ॲड. उमेश सुरेश सावंत
पत्ता :- अंबा निवास, बी. के. जी. रोड,
मु. पो. ता. कणकवली,
जि. सिंधुदुर्ग. पिन : ४१६६०२.

शिक्का :- UMESH SURESH SAWANT
B.A.LL.B.
ADVOCATE HIGH COURT
'AMBA NIVAS', B.K.G. ROAD, KANKAVLI - 416 602.

INQ. No.
EX. No.
Read & Recorded
A. G. G.



६) उद्देशांचे पूर्ततेसाठी व योग्य अंमलबजावणी आणि व्यवस्थापनेसाठी या विश्वस्त निधी पत्राअंतर्गत ''श्री. अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल''या न्यासासाठी खालीलप्रमाणे नियम करण्यात आले आहेत.

१) या न्यासाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असे राहील.

२) या न्यासाचे आर्थिक हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील. प्रथम वर्षाचे हिशोब दिनांक ३१/०३/२००७ रोजी पूर्ण करून विश्वस्त मंडळ ऑडिटर मार्फत हिशोबाची तपासणी करून घेतील. तद्नंतर दरवर्षी ३१ मार्च रोजी हिशोब पूर्ण करून घेणेत येतील.

३) या न्यासाचे विश्वस्त मंडळ हे कमीत कमी ३ व जास्तीत जास्त ११ राहील. न्यासाची व्यवस्था व कारभर पाहणयासाठी विश्वस्त मंडळ कार्यकारी मंडळाची स्थापना करेल. कार्यकारी मंडळात अध्यक्ष, सचिव, खजिनदार हे तीन पदाधिकारी राहतील .

४) विश्वस्त मंडळातील सदस्यांची नियुक्ती, सबळ कारणासाठी हकालपट्टी, राजीनामा मागणे इ. अधिकार मुख्य विश्वस्तांना राहतील.

५) कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील. परंतु ती ५ च्या पुढे वाढवता येणार नाही.

६) विश्वस्त मंडळातील सर्व सदस्यांचा कार्यकाल तदहयात असेल. त्यांच्या पश्चात त्यांच्या वारसांची विश्वस्त म्हणून नियुक्ती करणे न्यासावर बंधनकारक राहील. .

७) सेटलर हे तदहयात कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, न्यासाचे मुख्य विश्वस्त व सेटलर राहतील. त्यांच्या पश्चात ही पदे त्यांचे कायदेशीर वारस उपभोगतील.

८) सचिव, खजिनदार तसेच विश्वस्त मंडळाने कार्यकारी मडंळातील पदाधिकाऱ्यांची संख्या वाढवल्यास या सर्वांचा कालावधी ३ वर्षांचा राहील. त्यानंतर विश्वस्त मंडळातील सदस्यांमध्ये निवडणूक होऊन ही रिक्त पदे भरली जातील.

९) कोणत्याही पदाधिकाऱ्यांची पदे कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसांपेक्षा जास्त वेळ रिक्त ठेवता येणार नाहीत.

१०) या विश्वस्त निधी पत्राप्रमाणे रूपये १००१/- (रूपये एक हजार एक मात्र) इतकी रक्कम न्यास निधी म्हणून विश्वस्तांकडे कायम स्वरूपी राहील.

११) या न्यासासाठी उत्पन्नाचे मार्ग देणगी, स्थावर मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न, भाडे उत्पन्न, पेटी फंड, ठेवीवरील व्याज, इतर संस्थाकडून मिळणारी मदत, शासकीय / निमशासकीय संस्थांकडून मिळणारे अनुदान व देणगी, सांस्कृतिक कार्यक्रम अगर स्मरणिका प्रकाशनापासून मिळणारे उत्पन्न, क्रीडा स्पर्धातून मिळणारे उत्पन्न, न्यासाच्या विविध उपक्रमातून मिळणारे उत्पन्न आणि वैद्यकिय सेवेतून मिळणारे उत्पन्न या व अशा सर्व बाबींचा समावेश असेल.

१२) या पुढे न्यासाने खरेदी केलेली, संपादित केलेली तसेच देणगी, बक्षिस रुपाने मिळणाऱ्या सर्व मिळकती, रोख रक्कम, स्थावर जंगम मालमत्ता या न्यासाच्या मिळकती राहतील.

१३) वरील प्रमाणे जमा झालेल्या उत्पन्नाचा, मिळकतींचा उपयोग न्यासाचे उद्देश पूर्तीसाठी विश्वस्त मंडळ ठरवेल त्याप्रमाणे करणेत येईल.

१४) विश्वस्त मंडळाचे उद्देशपूर्तीसाठी स्थावर/ जंगम मालमत्ता, शेत जमिनी, घरे विकत घेणे, घरे विकत देणे, बांधून घेणे, भाडयाने देणे, गहाण ठेवणे, कर्ज काढणे, विक्री करणे असे सर्व व्यवहार मुंबई विश्वस्त कायदा १९५० चे कलम ३६ अन्वये करणेचे असून अशा मालमत्तेची देखरेख करणे, मालमत्तेचे रजिस्टर ठेवणे व हिशोब ठेवणेचे कामी नोकर वर्ग नेमणे, त्यांना नेमणुकीचे पत्र देणे, कामावरून कमी करणे, त्यांचा मेहनताना ठरविणे या व अशा सर्व कामांचे अधिकार कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांना असतील. मात्र त्यांनी अशा सर्व कामास विश्वस्त मंडळाचे सभेत मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

Bandekar. [signature] [signature]

१५) खालील कारणावरून विश्वस्तांचे विश्वस्त पद रद्द होईल.

अ) एखादा विश्वस्त न्यासाच्या सलग ५ सभांना कोणतेही कारण न देता अथवा मुख्य विश्वस्तांची परवानगी न घेता गैरहजर राहिल्यास.

ब) राजीनामा दिल्यास, मृत्यू पावल्यास अथवा शारिरीक व मानसिकदृष्टया अपात्र ठरल्यास.

क) नादार अथवा चारित्रहिन ठरल्यास.

ड) फौजदारी अथवा नैतिक अध:पतनांच्या गुन्हयाखाली शिक्षा झालेस.

इ) न्यासाच्या हिताविरूद्ध कोणतेही कृत्य केलेस अथवा न्यासाच्या हितास बाधा येईल असे कृत्य केलेस.

वर नमूद कलम १५ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही कारणाने रिकामी झालेली विश्वस्तांची जागा त्यांचे कायदेशीर वारस घेतील. जर कायदेशीर वारस अस्तित्वात नसतील तर त्याजागी मुख्य विश्वस्त नवीन विश्वस्तांची नियुक्ती करतील.

१६) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-

अ) अध्यक्ष :-

१) विश्वस्तांची नियुक्ती करणे, सबळ कारणासाठी हकालपट्टी करणे, त्यांचे राजीनामे स्विकारणे.

२) विश्वस्त मंडळांच्या सभांचे अध्यक्षस्थान स्विकारून त्या सभा निपक्षपातीपाणे पार पाडणे.

३) सभेच्या तारखा, वेळ व जागा निश्चित करणे.

४) सभेचे कामकाज सांभाळणे व कामाकाजावर देखरेख ठेवणे.

५) अनुकूल वा प्रतिकूल अशी सम समान मत विभागणी झाल्यास एक जादा निर्णायक मत (कास्टिंग व्होट) देणे.

६) सचिव यांनी न्यासाचे कामकाज सुरळीत व नियमीतपणे पार पाडले नाही तर स्वत:च्या अधिकारात न्यासाचे कामकाज पार पाडणे. विश्वस्त मंडळाच्या सभा स्वत:च्या अधिकारात बोलाविणे.

७) सचिंवामार्फत मांडण्यात आलेले ठराव विश्वस्त मंडळाच्या सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणे.

ब) सचिव :-

१) न्यासासाठी पत्रव्यवहार करणे व न्यासाचे दप्तर सांभाळणे.

२) वेळच्यावेळी विश्वस्त मंडळाच्या सभांचे मुख्य विश्वस्तांच्या पुर्वपरवानगीने आयोजन करणे व सभांचा वृत्तांत लिहीणे.

३) मासिक व वार्षिक जमा - खर्च, पुढील वर्षाचे अंदाजपत्रक, वर्गणीचे तपशीलआदी माहिती खजिनदाराकडून उपलब्ध करून घेऊन ती विश्वस्त मंडळापुढे मंजुरीसाठी सादर करणे.

४) विश्वस्त मंडळ व न्यासाचा नोकर वर्ग यांचा दुवा म्हणून काम करणे. नोकर वर्गाच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे व न्यासाचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पाहणे.

क) खजिनदार :-

१) न्यासाचा दैनंदिन, मासिक व वार्षिक जमा - खर्च ठेवणे.

२) देणगी, कर्ज, व्याज अगर येणे रक्कम जमा करून खर्चाची मंजूर झालेली बिले मुख्य विश्वस्त व विश्वस्त मंडळाच्या संमत्तीने संबंधिताना अदा करणे.

३) हिशोब संबंधाच्या सर्व रेकॉर्डची जबाबदारी खजिनदारावर राहील.

४) मासिक, वार्षिक अंदाजपत्रक तयार करून ते विश्वस्त मंडळाकडे सादर करणे.

५) न्यासाने ठरविलेल्या बँकेत नियमीतपणे जमा होणारी रक्कम जमा करणे व त्या अनुषंगाने येणारी कामे करणे.

ड) विश्वस्त मंडळाचे विश्वस्त :-

१) पदाधिकाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामात मदत करणे.

२) पदाधिकाऱ्यांच्या कामांची माहिती अवगत करून घेणे.

३) विश्वस्त मंडळाच्या सभांना नियमीत हजर राहून ठराव मंजुरीला मान्यता देणे. तसेच ठरावावर मतदान घ्यावयाचे ठरल्यास मतदान करणे.

१७) विश्वस्त मंडळाची सभा ३० दिवसांतून एकदा बोलवणे आवश्यक राहील. विश्वस्त मंडळाच्या सभेची नोटीस विश्वस्त मंडळाच्या विश्वस्तांना ७ दिवस अगोदर पाठवणे आवश्यक आहे. तातडीच्या सभेवेळी ही मुदत २४ तासांची राहील. सभेची नोटीस विश्वस्तांच्या हाती किंवा यु.पी.सी. पोस्टाने देण्यात येईल. नोटीस पोहोचलेबद्दल त्यांची सही न्यासाकडील नोटबुकांमध्ये घेण्यात येईल. न्यासाचे मुख्य विश्वस्त अशा सर्व सभांचे अध्यक्ष पद सांभाळतील. त्यांच्या गैरहजेरीत हजर विश्वस्त आपल्यापैकी कोणाचीही सभा अध्यक्ष म्हणून निवड करतील. सभेसाठी २ / ३ विश्वस्त हजर राहणे आवश्यक असून २ / ३ विश्वस्त हे कोरम असेल. कोरम अभावी तहकूब सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासाने भरेल. तीस कोरमची गरज असणार नाही. सभेतील सर्व निर्णय मतदान करून बहुमतांनी घेतले जातील.

कार्यकारी मंडळाची वेगळी सभा घेण्याची आवश्यकता नाही. कार्यकारी मंडळ आपले निर्णय विश्वस्त मंडळाच्या सभेत विश्वस्तांच्या संमत्ती व सल्ल्याने तसेच बहुमताने घेईल.

१८) न्यासाच्या नावे एक अगर अनेक राष्ट्रीयकृत किंवा शेडयुल बँकेत बँक खाती उघडता येतील. अशी सर्व खाती न्यासाचे नावांनीच उघडावयाची असून ती अध्यक्ष व सचिव किंवा खजिनदार यापैकी एक यांच्या संयुक्त सहीने चालविली जातील. रूपये ५०००/- पेक्षा जास्त रक्कम कोणीही आपल्या हातात न ठेंवता बँकेत जमा करावयाची आहे.

१९) विश्वस्त मंडळाचे असणारी सर्व रक्कम, सर्व प्रकारचे निधी इ. गुंतवणूक आयकर कायदा १९६० मधील तरतुदीप्रमाणे व मुंबई सार्वजनिक विश्वस्त निधी कायदा १९५० च्या कलम ३५ चे तरतुदीस आधिन राहून करणेत येईल. अशी गुंतवणूक न्यासाचे नावे करणेत येईल. याकामी सहया करणे व अशा गुंतवणुकी मुदतीनंतर काढून घेणेचे सर्व व्यवहार अध्यक्ष व सचिव सांचे संयुक्त सहीनेच करावयाचे आहे.

२०) कर्ज किंवा ठेवी या संबंधाची तरतूद :-

न्यासाला कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. मात्र त्यापूर्वी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६ प्रमाणे मे. असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांची रितसर परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच याच कायद्यातील तरतुदीस अधीन राहून व्याजी अगर बिन व्याजी ठेवी सुद्धा घेता येतील.

२१) स्थावर व जंगम मिळकतीची नोदवही :-

स्थावर व जंगम मिळकतीची नोंदवही मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीप्रमाणे विहीत नमुन्यात ठेवण्यात येईल. तसेच या मालमत्तेत होणारी वाढ अगर घट, स्थावर व जंगम मिळकत नोंद वहीत दरवर्षी नोंदवून घेवून वर्षातून एकदा तिची रूजवात घेणेत येईल. स्थावर व जंगम मिळकतीत होणाऱ्या वाढीला अगर त्रुटीचा बदल मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम २२ अन्वये मे. असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांना वेळेत व विहीत नमुन्यात विश्वस्त मंडळ सादर करील.

२२) न्यासाच्या स्थावर मिळकतीची डागडुजी :-

विश्वस्त मंडळाने न्यासाच्या सर्व स्थावर मिळकती सुव्यवस्थित ठेवाव्यात. वेळोवेळी जरूर ती दुरुस्ती व डागडुजी करावी. आवश्यकता असल्यास विमा उतरवावा आणि त्यासाठी दयावा लागणारा आकार न्यासाच्या उत्पन्नातून दयावा.

कोणत्याही स्थावर मिळकतीच्या दुरुस्तीसाठी अथवा नवीन बांधकाम करण्यासाठी रूपये १०,०००/- पेक्षा जास्त खर्च करावा लागणार असेल तर विश्वस्त मंडळाने निवीदा मागवणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारचे काम जर विश्वस्त मंडळ स्वत:च्या देखरेखीखाली किंवा एखादा विश्वस्त किंवा काही विश्वस्त मिळून करणार असेल तर त्यासाठी निविदा मागविण्याची आवश्यकता नाही तसेच विश्वस्त मंडळापैकी कोणीही किंवा एकाहून अधिक विश्वस्त न्यासास आवश्यक सामुग्री, यंत्रसामुग्री, इतर वस्तू मूल्याच्या मोबदल्यात (न्यासास विक्रीद्वारे) पुरवू शकतो पण त्यास विश्वस्त मंडळाची परवानगी आवश्यक आहे.

२३) न्यासामार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध शाखांबाबत नियम करणेचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.तथापि असे नियम विश्वस्त व्यवस्था पत्रातील तरतुदीशी व प्रचलित कायदयाशी विसंगत असता कामा नये.

२४) विश्वस्त मंडळातील कोणीही विश्वस्तास न्यासाच्या व्यवस्थापनासाठी अथवा न्यासाची मिळकत सुव्यवस्थित ठेवण्यासाठी केलेल्या स्वत:च्या खर्चाची रक्कम न्यासाच्या उत्पन्नातून परत घेता येईल. मात्र विश्वस्तांच्या कृत्यामुळे अथवा निष्काळजीपणामुळे न्यासास नुकसान झाल्यास त्याबद्दल त्यास जबाबदारधरले असलेस त्यांना ती रक्कम परत घेता येणार नाही आणि नुकसान भरपाईची रककम संबंधिताकडून वसूल करून घेण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

२५) देणगीदारांची यादी ठेवणेची पद्धत :-

न्यासाच्या सर्व देणगीदारांची यादी एका पक्क्या नोंदवहीत ठेवण्यात येईल. सदर वहीमध्ये देणगीदारांची पूर्ण नावे, पत्ते यांची नोंद ठेवून ती ट्रस्ट कायदयान्वे मे. धर्मादाय उप आयुक्त यांचेकडे दरवर्षी सादर करण्यात येईल.

२६) करार :-

न्यासाच्या उद्दिष्ट पूर्ततेसाठी विश्वस्त मंडळ न्यासासाठी स्थावर व जंगम मिळकत खरेदी, भाडयाने, भाडेपट्टयाने देणगीने अगर अन्य प्रकाराने देवू व घेवू शकेल. अशा प्रकारे द्यावयाच्या किंवा घ्यावयाच्या मिळकतीची किंमत, भाडयाची रक्कम ठरविण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील. तसेच तसे करार करणे व रद्द करणेचे अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

२७) या विश्वस्त व्यवस्थापत्रातील नियम, उद्देश, नाव अथवा अन्य बदल करणेंचा अधिकार मुख्य विश्वस्तास राहील. परंतु त्यासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे तरतुदीस अधिन राहून सक्षम अधिकाऱ्यांची वा न्यायालयाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

२८) विश्वस्त मंडळास सल्लागार समिती किंवा विशिष्ट कारणासाठी उपसमिती नेमणेचा, ती बरखास्त करणेचा अधिकार राहील. तथापि अशा समितीच्या सर्व कार्यास विश्वस्त मंडळ पूर्णपणे जबाबदार राहील.

२९) कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना, सल्लागार समिती, उपसमिती सदस्यांना विश्वस्त मंडळाच्या सभेत प्रस्ताव मांडून मानधन / मेहनताना दिले जाईल. असे मानधन त्या त्या सभेत ठरविले जाईल. कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना, सल्लागार समिती, उपसमिती सदस्यांना दिले जाणारे मानधन समान असावे. एखादा विश्वस्त कार्यकारी मंडळाचा पदाधिकारी असताना एखाद्या सल्लागार अथवा उपसमितीचा सदस्य असेल तर किंवा एकाहून अधिक समित्यात असेल तर त्याला एकाच ठिकाणचे मानधन / मेहनताना दिला जावा.

Bandekar

[handwritten signature]

[signature]

३०) न्यासाला खरोखर उपयोगी पडतील अशा व्यक्तींना विश्वस्त मंडळाच्या सभेस मुख्य विश्वस्तांच्या पूर्व परवानगीने निमंत्रित म्हणून बोलविता येईल. परंतु त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

३१) मुख्य विश्वस्तांच्या राजीनाम्याने न्यासाचे अस्तित्व संपुष्टात येईल.

३२) न्यास बंद करायचे अगर न्यासाचे सर्व व्यवहार थांबवायचे झालेस मुख्य विश्वस्त सर्व विश्वस्तांचे संमत्तीनेच ठराव करून त्या न्यासाची सर्व मालमत्ता, गुंतवणुकी, शिल्लक, येणी - देणी दुसऱ्या एखादया समान उद्देश असणाऱ्या न्यासाचे नावे वर्ग करता येईल. मात्र अशा न्यासाच्या विश्वस्त मंडळाने योग्य त्या स्टॅम्प पेपरवर मालमत्तेचा स्विकार केल्याचे व न्यासाचे उद्देश पूर्तीसाठी या मालमत्तेचा वापर करणार असल्याचे जाहिर करणे आवश्यक असेल.

वरीलप्रमाणे कलम १ ते ३२ प्रमाणे तरतुद करून, राजीखुशीने व अक्कल हुशारीने "**श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल**" साठी विश्वस्त व्यवस्थापत्र आज दिनांक १४/०३/ २००६ रोजी ओरोस याठिकाणी केले आहे.

सार्वजनिक विश्वस्त निधी पत्र लिहीणार

सेटलर :-

| अ. क्र. | नाव | सही |
|---|---|---|
| १ | श्री. चिराग शंभू बांदेकर | Bandekar. |

साक्षीदार :-

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव व पत्ता | सही |
|---|---|---|
| १ | श्री. महेश काशीराम मोडक<br>मु. पो. बोर्डवे, भराडीवाडी,<br>ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. | [signature] |
| २ | श्री. संदिप तातोबा हरमलकर<br>मु.पो. कसाल, ता. कुडाळ,<br>जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३. | Harmalkar |

Bandekar.    [handwritten signature]    [signature]

आम्ही या विश्वस्त निधी पत्रातील सर्व विश्वस्त असे जाहिर करतो की, आम्ही ''श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल'' ता.कुडाळ, जि. सिंधुदुर्ग या न्यासाचे सर्व उद्देश, नियम व अटी वाचले असून ते आम्हांस मान्य व कबूल आहेत. या विश्वस्त निधी पत्रातील निधीचा आम्ही सर्वानी स्वीकार केला असून आम्ही न्यासाचे विश्वस्त म्हणून काम करणेची या पत्राद्वारे संमत्ती दर्शवित आहोत.

| अ.क्र. | संपूर्ण नाव | सही |
|---|---|---|
| १ | श्री. चिराग शंभू बांदेकर | Bandekar. |
| २ | श्री. जयवंत अनंत बांदेकर | जयवंत अनंत बांदेकर |
| ३ | श्री. सचिन सुर्यकांत परब | [signature] |

साक्षीदार :-

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव व पत्ता | सही |
|---|---|---|
| १ | श्री. महेश काशीराम मोडक<br>मु. पो. बोर्डवे, भराडीवाडी,<br>ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. | [signature] |
| २ | श्री. संदिप तातोबा हरमलकर<br>मु.पो. कसाल, ता. कुडाळ,<br>जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६६०३. | [signature] |

Bandekar. जयवंत अनंत बांदेकर [signature]

परिशिष्ट- ३

(कानुन १३ (२) पहा)

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय ओरोस, जि.सिंधुदुर्ग येथे टेवण्यात आलेल्या रजिस्टरात नोंदविलेल्या नोंदितील बदलाबाबत इतर अशा करावयाच्या रिपोर्ट

सार्वजनिक ट्रस्टचे रजिस्टर नंबर:- ई-२९९/सिंधुदुर्ग

सार्वजनिक ट्रस्टचे नांव व पत्ता:- श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट, कसाल
द्वारा श्री शंभू अनंत बांदेकर, घर नं.९५५अ, नवा बाजार,
मु.पो. कसाल, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पीन ४१६६०३

| अ. न. | बदलाचे स्वरूप | बदलाचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | न्यासाचे पी टी आर उताऱ्यावरील खालील विश्वस्तांचे नावासमोर खालीलप्रमाणे पदाची नोंद करणेत यावी.<br>१) श्री तुकाराम यशवंत सोळूंखे - उपाध्यक्ष<br>२) श्री विट्ठल गोपाळ सोनवडेकर - सचिव<br>३) श्री गोपाळ तातोबा हरमलकर - सह-सचिव<br>४) श्री सचिन सूर्यकांत परब - खजिनदार<br>न्यासाचे पी टी आर उताऱ्यावर सन २०२१ ते ३०/०६/२०२६पर्यंत खालील स्वीकृत विश्वस्तांची नोंद करणेत यावी<br>१) साईलिला हॉस्पीटल, नाटळ, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग तर्फे मेडिकल डायरेक्टर डॉ. बाळकृष्ण शिवराम म्हाडेश्वर - स्वीकृत विश्वस्त रा. कणकवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग<br>२) म्हसकर हॉस्पीटल, कणकवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग तर्फे व्यवस्थापकीय मुख्य डॉ. श्री मोहन दिनकर म्हसकर - स्वीकृत विश्वस्त रा.कणकवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग<br>३) गेटवेल हॉस्पीटल, कणकवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग तर्फे व्यवस्थापकीय मुख्य डॉ. श्री निलेश विजय पाकळे - स्वीकृत विश्वस्त रा.कणकवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग. | न्यासाचे योजनेतील तरतुदीनुसार न्यासाचे दैनंदिन व्यवस्थापनाचे दृष्टीने पदाधिकारी नियुक्त करणे आवश्यक असलेने न्यासाचे दिनांक ०५/०९/२०२१ इ.स. रोजीचे सभेत पदाधिकारी निवड करणेत आलेले तसेच न्यासामार्फत संचलित इस्टिट्यूट ऑफ नर्सिंग, कसालच्या परिचर्या अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी विविध रूग्णालये संलग्न करणे तसेच शासनाचे धोरणानुसार सदर संलग्न रूग्णालयाचे व्यवस्थापनाचे मुख्य अथवा सदस्य यांना विश्वस्त मंडळामध्ये स्वीकृत करणे आवश्यक असलेने न्यासाचे दि. ०५/०९/२०२१ रोजीचे सभेत स्वीकृत विश्वस्त निवड करणेत आलेने. | १) न्यासाचे विश्वस्त मंडळ सभेची नोटीस व पोहोच - झेरॉक्स<br>२) न्यासाचे विश्वस्त मंडळ सभेची उपस्थिती व वृत्तांत - झेरॉक्स<br>३) नवीन पदाधिकारी व स्वीकृत विश्वस्तांचे संमतीपत्र - अस्सल<br>४) नवीन पदाधिकारी व स्वीकृत सदस्यांचे ओळखपत्र - झेरॉक्स<br>५) योजनेची प्रत - झेरॉक्स<br>६) पी.टी.आर उतारा - झेरॉक्स |

President

Shree Anant Smriti Charitable Trust
Kasal

रिपोर्ट करणाऱ्याची सही

खरांप्रत

मुख्याध्यापक
न्यु इंग्लिश स्कूल, कसाल
ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग

मी श्री चिराग शंभू बांदेकर रा.कसाल, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील रहीवाशी असून प्रतिज्ञापुर्वक करार करतो की, वरील अर्जात नमुद केलेली माहीती माझ्या माहीतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

ठिकाण:- सिंधुदुर्गनगरी ओरोस

दिनांक:- ०६/०९/२०२१

I know the deponent

(Adv S.P. Kadam)

President

Shree Anant Smriti Charitable Trust

Kasal

Solemnly affirmed & signed before me on 6/9/2021 by Shri/Smt. chirag shambhu Bandekar who is identified to me by Shri/Smt. Adv. S.P. Kadam whom I personally know.

6/9/2021

अधिक्षक

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

20रु. Rs.20 पी. डी. [illegible] मुद्रांक विक्रेता सिंधुदुर्गनगरी 25 AUG 2021 वीस रुपये TWENTY RUPEES

20रु. Rs.20 पी. डी. [illegible] मुद्रांक विक्रेता सिंधुदुर्गनगरी 25 AUG 2021 वीस रुपये TWENTY RUPEES

20रु. Rs.20 पी. डी. [illegible] मुद्रांक विक्रेता सिंधुदुर्गनगरी 25 AUG 2021 वीस रुपये TWENTY RUPEES

20रु. Rs.20 पी. डी. [illegible] मुद्रांक विक्रेता सिंधुदुर्गनगरी 25 AUG 2021 वीस रुपये TWENTY RUPEES

20रु. Rs.20 पी. डी. [illegible] मुद्रांक विक्रेता सिंधुदुर्गनगरी 25 AUG 2021 वीस रुपये TWENTY RUPEES

In view of letter of Hon'ble CC dated 17.6.2021 it is necessary to publish in local newspaper. Hence applicant is directed to publish in local newspaper widely circulate in district along with publication on PTF office.

R/O 18.10.2021

6/9/2021

धर्मादाय आयुक्त

सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

सत्यमेव जयते

खरी प्रत

7/9/2021

अधिक्षक

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,

सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग